अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

## मोदी आडनाव बदनामी प्रकरणात राहुल गांधींना २ वर्षांची शिक्षा; जामीनही मंजूर

**नवी दिल्ली** : मोदी आडनाव बदनामी प्रकरणी सुरत न्यायालयाने राहुल गांधी यांना दोषी ठरवण्यात आले आहे. त्यांना या प्रकरणात सुरत कोर्टाने दोन वर्षांची शिक्षा सुनावली आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान राहुल गांधींनी मोदी आडनावावर भाष्य करताना म्हटले होते की, सर्व चोरांचे आडनाव मोदी आहे का?

याप्रकरणी राहुल गांधी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी सुरतच्या न्यायालयाने सकाळी ११ वाजता निकाल देत राहुल गांधींना दोषी ठरवले आहे. या प्रकरणात राहुल गांधी यांना दोन वर्षाची शिक्षा सुनावण्यात आलेली आहे. तर या प्रकरणात त्यांना १५ हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन देखील मंजूर करण्यात आला आहे. सुरतच्या सीजेएम कोर्टात पोहोचल्यावर कोर्टाने राहुल गांधी यांना दोषी ठरवले. यानंतर कोर्टाने राहुल गांधींना विचारले की तुम्हाला काय म्हणायचे आहे, तेव्हा राहुल गांधी म्हणाले, मी नेहमीच भ्रष्टाचाराच्या विरोधात बोलतो. मी मुद्दाम कोणाच्या विरोधात बोललो नाही. यामुळे कोणाचेही नुकसान झाले नाही.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान राहुल गांधी हे कर्नाटकातील कोलारमध्ये म्हणाले होते की, सर्व चोरांची आडनावे मोदी कशी आहेत? राहुल गांधींच्या या वक्तव्यानंतर सुरत पश्चिमेतील भाजप आमदार पूर्णेश मोदी यांनी त्यांच्यावर मानहानीचा खटला दाखल केला होता. राहुल गांधींनी मोदी समाजाचा अपमान केल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले होते. यानंतर हे प्रकरण सुरतच्या न्यायालयात पोहोचले. गेल्या महिन्यात पूर्णेश मोदी यांनी या प्रकरणी लवकर निर्णय घेण्यासाठी गुजरात उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. २४ मार्च २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १७४ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## तिन्ही तपास पथकांचा अहवाल एकच

# तो 'प्लॅस्टिक'चा नव्हे; 'फोर्टिफाईड'चा तांदूळच

सुराज्य/सोलापूर

**सांगोला तालुक्यातील घेरडीच्या शाळेत चक्क प्लॅस्टिकचा तांदूळ आढळल्याने विद्यार्थ्यांसह पालकांमध्ये खळबळ उडाली होती. पोषण आहाराच्या नावाखाली कुपोषण करणारा प्लॅस्टिकचा तांदूळ विद्यार्थ्यांच्या पोटात जात आहे की काय अशी शंका उपस्थित केली जात होती. त्यामुळे खडबडून जागे झालेल्या प्रशासनाने त्या तांदळाची कसून तपासणी केली. त्यावेळी 'तो' प्लॅस्टिकचा तांदूळ नसून फोर्टिफाईडचा तांदूळ असल्याचे निष्पन्न झाले असून फोर्टिफाईडच्या तांदळामध्ये पोषक घटक असल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याला उत्तम असल्याचा शेरा प्रशासनाकडून मारण्यात आला आहे.**

घेरडी(ता. सांगोला) येथील सरपंच सुरेखा यशवंत पुकळे यांनी या भेसळीचा भांडाफोड केला होता. त्यांना रेशनच्या तांदळामध्ये पहिल्यांदा भेसळीचा हा प्रकार लक्षात आला. तांदळासारखा हुबेहूब दिसणारा प्लॅस्टिकचा तांदूळ मिसळण्यात आल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी प्लॅस्टिकच्या तांदळाचे दाणे वेचून काढल्यानंतर मूळ तांदूळ आणि प्लॅस्टिकचा तांदूळ यातील फरक स्पष्टपणे जाणवला. त्यानंतर त्यांनी गावातील प्राथमिक शाळेतील तांदूळ तपासला; तेव्हा त्यातही प्लॅस्टिकचा तांदूळ मिसळण्यात आल्याचे निदर्शनास आले होते. त्यांनी याबाबतची तक्रार केल्यानंतर पुरवठा विभाग, अन्न व औषध विभाग आणि शिक्षण विभाग खडबडून जागा झाला. जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी या तांदळाची तपासणी करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार तपासणी करण्यात आली असून तपासाअंती तो प्लॅस्टिकचा नव्हे तर फोर्टिफाईड तांदूळ असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसा अहवालच पुरवठा विभागाला संबंधित यंत्रणेकडून सादर करण्यात आल्याची माहिती सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी विवेक साळुंखे यांनी 'सुराज्य'ला दिली.





### फोर्टिफाईडचा आरोग्याला धोका नाही

शालेय पोषण आहारामध्ये प्लॅस्टिकचा तांदूळ सापडल्याची तक्रार आली होती. त्यानुसार अन्न व औषध प्रशासन, जिल्हा पुरवठा अधिकारी, शिक्षण विभाग यांच्या संयुक्त पथकाने तपासणी केली असता हा तांदूळ शासन निर्णयाप्रमाणे फोर्टिफाईड तांदूळ असल्याचे आढळून आले आहे. यापासून विद्यार्थ्यांच्या आरोग्याला कोणताही धोका नाही. तसे प्रमाणपत्र अन्न औषध प्रशासन विभागाने दिले आहे.

**- विवेक साळुंखे (सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी)**

### फोर्टिफाईड तांदूळच का?

विद्यार्थ्यांच्या आहारामधील सूक्ष्म पोषकतत्त्वांची कमतरता भरून काढण्याकरिता फोर्टिफाईड तांदूळ दिला जातो. यामध्ये आयर्न, फॉलिक ॲसिड, आणि व्हिटॅमिन बी१२, झिंक, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी १, २, ३, ५, ६ या पोषक घटकांचा समावेश करून हा तांदूळ बनवण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अधिकची पोषकतत्त्वे मिळण्याच्या दृष्टीने हा तांदूळ अत्यंत उपयुक्त आहे.

### गैरसमज का होतो?

प्रक्रिया करण्यात आलेल्या फोर्टिफाईड तांदळाचे वजन हे नियमित तांदळापेक्षा कमी असते. त्यामुळे हा तांदूळ पाण्यामध्ये तरंगताना दिसून येतो. पोषण आहार योजनेतील तांदळापैकी काही तांदूळ पिवळसर रंगाचा दिसतो आणि पाण्यामध्ये तांदूळ भिजू घातल्यानंतर त्यापैकी काही तांदूळ पाण्यावर तरंगत असल्याचे निदर्शनास येतात. त्यातून तो तांदूळ प्लॅस्टिकचा असल्याचा गैरसमज होतो.

### किती आहे मिश्रणाचे प्रमाण?

केंद्र शासनाकडून शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२ पासून पोषण आहार योजनेअंतर्गत फोर्टिफाईड तांदळाचा केला जात आहे. पुरवठा करण्यात येणाऱ्या तांदळामध्ये फोर्टिफाईड तांदूळ व नियमित तांदूळ यांचे प्रमाण १:१०० आहे. म्हणजेच पुरवठा करण्यात आलेल्या तांदळामध्ये फोर्टिफार्इड तांदळाचे प्रमाण १ किलोमध्ये १० ग्रॅम या प्रमाणात आहे.

## १ लाख रुपयांची लाच घेताना सरपंच पती कोलते यांना अटक

### उस्मानाबाद लाचलुचपत प्रतिबंधक पथकाची कारवाई

सुराज्य/परंडा



तालुक्यातील रोहकल येथील सरपंच पती हनुमंत कोलते यांना दि २३ मार्च रोजी ठेकेदारा कडून १ लाख रुपयाची लाच घेताना उस्मानाबाद लाच लुचपत विरोधी पथकाने रंगेहात पकडून अटक केली आहे.

याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचा वतीने मिळालेली माहिती अशी की यातील तक्रारदार हे मेनकर एनर्जी प्रायवेट लिमिटेड कंपनी मध्ये साईट सुपर वायझर म्हणून नेमणुकीस आहेत आणि कंपनीचे जल जीवन मिशन अंतर्गत सौर उर्जेवर आधारित दुहेरी पंप लघुनळ योजनेचे अठरा लाख रुपये किमतीचे काम रोहकल, तालुका परांडा येथील ३ वस्तीवर चालू असून यातील आरोपी सरपंच पती हनुमंत पांडुरंग कोलते यांनी सदर योजनेचे काम थांबवून ते पूर्ववत चालू करू देण्यासाठी यातील तक्रारदार यांना दिनांक २२ मार्च रोजी चालू असलेल्या तिन्ही कामाचे प्रत्येकी ५० हजार रुपये प्रमाणे दीड लाख रुपये किंवा सोलरच्या तीन प्लेट व त्याचे साहित्य अशा लाचेची मागणी पंचांसमक्ष करून तडजोडी अंती १ लाख रुपये मान्य केले होते. या प्रकरणी तक्रारदार यांनी दि २२ मार्च रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागा कडे तक्रार दाखल केली होती या तक्रारी वरून दिनांक २३ मार्च रोजी कोलते यांनी १ लाख रुपये लाचेची रक्कम जिल्हा परिषद उपहार गृह उस्मानाबाद येथे पंचांसमक्ष स्वीकारल्याने आरोपी यांना ताब्यात घेतले असून पोलीस स्टेशन आनंदनगर, उस्मानाबाद येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सापळा अधिकारी सिध्दाराम म्हेत्रे, पोलीस उपधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग उस्मानाबाद संदीप आटोळे, पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद विशाल खांबे, अपर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शना खालील पथक पोलीस अंमलदार दिनकर उगल मुगले, इफ्तेकार शेख, सचिन शेवाळे, विष्णू बेळे, सिध्देश्वर तावसकर यांनी कारवाई केली आहे.

## पुणे-मुंबई थेट विमानसेवा सुरु होणार

**मुंबई** : मुंबई-पुणे प्रवास आता एका तासावर येणार आहे. या दोन महत्त्वाच्या शहरांदरम्यान थेट विमानसेवा सुरू करण्याची अनेक वर्षांपासूनची मागणी अखेर पूर्ण होणार आहे.

मुंबई-पुणे प्रवास करणाऱ्यांची संख्या प्रचंड प्रमाणात आहेत. त्यांना प्रवास करण्यासाठी वेगवेगळ्या रेल्वे उपलब्ध आहेत किंवा काही बसेसदेखील उपलब्ध आहे. मुंबई-पुणे प्रवास करण्यासाठी चार तास लागतात मात्र हाच प्रवास जर एका तासावर येणार आहे.एअर इंडिया २६ मार्चपासून थेट उड्डाण सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. थेट उड्डाणामुळे दोन मेट्रो शहरांमधील प्रवासाचा नेहमीचा वेळ तीन तासांवरून एक तासापर्यंत कमी होईल. विशेष म्हणजे या दोन गजबजलेल्या कॉस्मोपॉलिटन शहरांमध्ये थेट विमानसेवा नव्हती. एअर इंडिया थेट उड्डाण करणारी पहिली ऑपरेटर ठरली. वेळेची बचत होण्यासाठी ही सेवा सुरू करण्यात आली आहे.



मात्र लागणारा वेळ पाहता दोन्ही शहरात एअर इंडिया थेट उड्डाण करण्याचा निर्णय घेतला आहे. काही वर्षांपूर्वी मुंबई-पुणे थेट विमानसेवा होती मात्र २०१९ मध्ये बंद करण्यात आली होती.उड्डाणे शनिवार वगळता आठवड्यातून सहा दिवस सध्याच्या वेळापत्रकानुसार चालतील. एअर इंडियाचे विमान पुणे विमानतळावरून सकाळी ११.२० वाजता निघून मुंबईत १२.२० वाजता पोहोचेल. त्यासाठीचे बुकिंगही सुरू झाले आहे.

**वेळ व तिकीट**

- पुणे-मुंबई : सुटण्याची वेळ: सकाळी ११:२० आणि आगमनाची वेळ: दुपारी १२:२०
- तिकीट दर : इकॉनॉमी: २,२३७ रुपये आणि बिझनेस क्लास: १८,४६७ रुपये

## तडीपार आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**सोलापूर** : तडीपार आदेशाचा भंग करून सोलापूर शहरात वावरत असताना तडीपार आरोपीस ताब्यात घेऊन एमआयडीसी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नदीम सलीम नदाफ (वय-२७, रा.उत्तर कसबा, चौपाड, सोलापूर) यास पोलीस उपायुक्त (परिमंडळ) यांचेकडील तडीपार क्रमांक २६५२/२०२१ दि.१६ नोव्हेंबर २०२१ रोजी पासून दोन वर्षाकरिता सोलापूर शहर व जिल्ह्यातून तडीपार करण्यात आलेले आहे. या तडीपार आदेशाचा अंमल चालू असताना पूर्व परवानगी शिवाय तडीपार आदेशाचा भंग करून सोलापूर शहरात वावरत असताना मिळून आलेला आहे. म्हणून फिर्यादी पोलीस कॉन्स्टेबल शैलेश श्रीशैल स्वामी नेमणूक एमआयडीसी पोलीस ठाणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तडीपार आरोपीविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## मुंढेवाडीजवळ दुचाकीच्या धडकेत एक ठार

सुराज्य/सोलापूर

दोन मोटरसायकलींची समोर समोर धडक होऊन झालेल्या अपघातात एक दुचाकीस्वार जागीच ठार झाल्याची घटना अक्कलकोट तालुक्यातील मुंढेवाडी-तडवळ रस्त्यावर आज गुरुवारी सकाळी घडली.

राजकुमार शरणाप्पा गंदले (वय ४० वर्ष, ता. मुंढेवाडी, अक्कलकोट ) असे त्या मयत मोटरसायकल स्वाराचे नाव असून ते आज गुरुवारी सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास मुंढेवाडी गावाकडून तडवळ कडे मोटरसायकल वरून निघाले असताना मुंडेवाडी पासून दीड किमी अंतरावर समोरून येणाऱ्या दुसऱ्या दुचाकी ने जोरदार धडक दिली . या धडकेत ते गंभीर जखमी होऊन बेशुद्ध पडले . त्यांना उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात बेशुद्ध अवस्थेत भाऊ योगिराज यांनी दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

## ट्रान्सफॉर्मरवर काम करताना वायरमनाचा जागीच मृत्यू

**बार्शी** : विजेच्या ट्रान्सफार्मरवर काम करीत असताना अचानक विद्युत प्रवाह सुरू झाल्याने वायरमनचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दवी घटना बार्शी तालुक्यातील मालवंडी येथे गुरुवार दि.२३ रोजी दुपारी २.३० च्या सुमारास घडली.

निलेश राजेंद्र होनराव (२६ रा. मालवंडी ता.बार्शी) असे त्या मयत वायरमनचे नाव आहे मालवंडी गावासह परिसरातील शेतीपंपाचा विज पुरवठा सुरळीत ठेवण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली होती. दुपारी २.३० वाजेच्या दरम्यान ते विजेच्या ट्रान्सफार्मरवर चढून आपले काम करीत असताना अचानक विजेचा प्रवाह सुरू झाला आणि क्षणार्धात त्यांना काही कळायच्या आत विजेचा झटका बसल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात आई, वडील, दोन विवाहित बहिणी, असा परिवार असून निलेश याचा गेल्या पंधरा दिवसांपूर्वीच साखरपुडा झाला होता. ११ मे लग्न सोहळा आयोजित करण्यात आला होता त्यामुळे मालवंडी गावासह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.


## शेतकऱ्याची कीटकनाशक पिऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

अज्ञात कारणावरून एका शेतकऱ्याने स्वतःच्या शेतात पिकावर फवारणी करण्याचे किटकनाशक औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना करजगी गावात बुधवारी घडली. अशोक गिरीमल्लप्पा कुंभार (वय ४० वर्ष, रा करजगी) असे त्या मयत शेतकऱ्याचे नाव आहे. अज्ञात कारणावरून त्यांनी बुधवारी दुपारी बारा वाजेच्या सुमारास स्वतःच्या शेतात पिकांवर फवारणी करण्याची किटकनाशक औषध पिले. त्रास होऊ लागल्याने त्यांना करजगी येथील सरकारी दवाखान्यात प्रथम उपचार करून येथील शासकिय रुग्णालयात बेशुद्ध अवस्थेत वडील गिरीमल्लप्पा यांनी दाखल केले असता त्यांचा बुधवारी रात्री उपचार दरम्यान मृत्यू झाला.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




ते ओव्हर स्मार्ट निघाले

| कल्याण |
| --- |
| 126-97-340 |

| मेन बाजार |
| --- |
| --------- |

## चेन्नई-सुरत ग्रीनफिल्ड मोबदला प्रकरणी

# पालकमंत्र्यांनी शब्द पाळला नाही शेतकरी आक्रमक

सुराज्य/सोलापूर

चेन्नई-सुरत ग्रीनफिल्ड बाबतीत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शासन पातळीवर बैठक घेऊन तोडगा काढण्याचे आश्वासन दिले होते. अद्याप बैठक झाली पालकमंत्र्यांनी दिलेला शब्द पाळला नाही त्यामुळे चेन्नई सुरत ग्रीनफिल्ड शेतकरी संघर्ष समितीने आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय घेतला आहे.सोमवारी २७ मार्च रोजी सकाळी १० वाजता अक्कलकोट मार्गावरील बाधित शेतकरी व विविध संघटना, राजकीय पक्ष शेतकऱ्यांच्या समर्थनाथ चक्का जाम आंदोलन केले जाणार असल्याचे शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष बाळासाहेब मोरे यांनी सांगितले.

### सोमवारी अक्कलकोट मार्गावर चक्का जाम आंदोलन

अक्कलकोट दक्षिण सोलापूर आणि बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांनी कमी मिळाल्याच्या मोबदला निषेधार्थ प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन सुरू केले होते. यानंतर पालकमंत्र्यांनी तातडीची बैठक घेऊन या कामाला स्थगित देत. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या दालनामध्ये बैठक लावणार असल्याचे जाहीर केले होते.बैठक होऊन पंधरा दिवस झाले तरी अद्याप बैठकीचे निमंत्रण समितीला देण्यात आले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांकडून रोज या विषयाबाबत विचारणा होत आहे. प्रशासनाचे कामकाजही सुरूच आहे. महामार्गा संदर्भात विविध कार्यवाही चालू आहे. त्वरित निर्णय घ्यावा अन्यथा पुन्हा आंदोलन सुरू करण्याचा इशारा समितीने दिला आहे. पालकमंत्र्यांच्या आश्वासनानंतर नियोजित चक्काजाम आंदोलन देखील स्थगित करण्यात आले होते. आता ते पुन्हा करण्यात येइ येणार आहे.वास्तविक पाहता शेतकऱ्यांना याबाबतीत अंधारात ठेवले जात आहे निर्णय घेण्यास उशीर करण्यात येत आहे प्रथमदर्शनी शेतकऱ्यांवर अन्याय झालेला असताना सरकार व प्रशासन निर्णय घेण्यास इतका विलंब का करत आहे? असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.



शेतकऱ्यांच्या भावना तीव्र आहेत. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्यासोबत या गंभीर प्रश्नाबाबत बैठक होणे अपेक्षित आहे.मात्र मंगळवार पर्यंत या बाबतीत कोणताच निरोप मिळालेला नाही. पालकमंत्री शब्द देऊन जर पाळत नसतील तर त्या शब्दाला काही अर्थ उरणार नाही.मग हे सरकार शेतकरी विरोधी असल्याचे यावरून सिद्ध होते. शेतकऱ्यांना उध्वस्त करण्याचा डाव सरकारचा आहे की काय अशी शंका निर्माण होते. सरकारने लवकर निर्णय घ्यावा.अन्यथा आम्ही गप्प बसणार नाही.

**- बाळासाहेब मोरे**

(अध्यक्ष, चेन्नई सुरत ग्रीनफील्ड हायवे संघर्ष समिती)